आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ डिसेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- जागा वाटपाचा तिढा लवकर सोडवण्याचा विश्वास भाजपा आणि शिवसेनेकडून व्यक्त

- खोपोली इथल्या मंगेश काळोखे यांच्या हत्येप्रकरणी ७ जणांना अटक, जलदगती न्यायालयात खटला चालवण्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आश्वासन

- बंधक म्हणून ठेवलेल्या ५३ मजुरांची सोलापुरातून सुटका

आणि

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात द्वारे देशवासियांशी संवाद साधणार

<><><><><>

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीतल्या घटक पक्षांमधे चर्चा सुरू असून युती होण्यात कसलीही अडचण नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. अमरावती इथं भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार सोहळ्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. जागावाटपाचा तिढा लवकरच सुटेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

त्याआधी देशाचे पहिले कृषीमंत्री पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीदिनी दिला जाणारा भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आला. अमरावतीत आयोजित सोहळ्यात वैज्ञानिक विजय भटकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

<><><><><>

जो निवडून येईल त्यालाच उमेदवारी देण्याचा विचार महायुतीतले घटक पक्ष करत असल्यामुळे मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठीच्या जागावाटपाला वेळ लागत असल्याचं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मुंबईत माध्यमांशी बोलताना सांगितलं. मात्र, भाजपा आणि शिवसेनेत युती होईल असं त्यांनी स्पष्ट केलं. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना राष्ट्रवादी  काँग्रेससोबत युती करणार असल्याचं वृत्त त्यांनी यावेळी फेटाळून लावलं.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले तर काँग्रेस स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल, असं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. शक्य तिथे वंचित बहुजन आघाडीसोबत आघाडी करण्याचा प्रयत्न सुरू असून, समविचारी पक्षांसोबत आघाडी करण्याच्या सूचना स्थानिक नेत्यांना दिल्या असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील जागावाटपाबाबत पहिली बैठक पार पडली. युती आणि जागावाटपाचा फार्म्युला सुमारे ९९ टक्के निश्चित झाला आहे. मात्र १ ते २ जागांवरील तिढा सोडवण्यासाठी लवकरच दुसरी बैठक होईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी दिली. काही प्रभागांमध्ये मैत्रीपूर्ण लढतीचीही तयारी असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

सोलापूर महापालिकेसाठी काँग्रेसनं आज १० प्रभागातल्या २० उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. आम आदमी पार्टीनं पहिल्यांदाच नवी मुंबई आणि भिवंडी महापालिकेची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही महापालिकेत अधिकाधिक जागा लढवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

पुण्यातल्या विशेष मकोका न्यायालयाच्या परवानगी नंतर गुंड बंडू आंदेकर यांनं पोलीस बंदोबस्तात आज पुणे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. एका खून प्रकरणात तो आरोपी आहे.

<><><><><>

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रक्रीयेदरम्यान मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यासाठी सर्व २९ महापालिकांना आणखी आठवडाभर मुदत दिली आहे. यापूर्वी दिलेल्या दिशानिर्देशानुसार आज या याद्या प्रसिद्ध होणं अपेक्षित होतं. पण आता ३ जानेवारीपर्यंत मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची मुभा राज्य निवडणूक आयोगानं काल सर्व महापालिकांना दिली आहे. मात्र या सर्व महापालिकांना दुबार मतदारांची माहिती आज जाहीर करावी लागेल.

<><><><>

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुमारे १३ हजार मतदारांची नाव दोनवेळा आढळून आली आहेत. यापूर्वी ४५ हजार मतदारांची नावं दोन वेळा असल्याचं आढळून आलं होतं. बीएलओमार्फत पडताळणी केल्यावर हा आकडा १३ हजारापर्यंत कमी झाला. या सर्व मतदारांकडून ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत याबद्दलच हमीपत्र घेण्यात आलं आहे.

<><><><>

राज्यभरातल्या महापालिकांमध्ये मतदान आणि मतमोजणीसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण सुरू आहे. यात निवडणूक प्रक्रियेसह मतदान यंत्र हाताळणीची माहिती दिली जात आहे. निवडणुकीचं कर्तव्य बजावणे आणि हे प्रशिक्षण पूर्ण करणे प्रशासनानं सर्वांना बंधनकारक केलं आहे.

<><><><>

यवतमाळमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दोन गटात हाणामारी झाली. नगर परिषद निवडणुकीत ५८ पैकी एकही जागा शिवसेनेला जिंकता आली नाही. या पराभवाला खासदार संजय देशमुख यांची निष्क्रिय भूमिका जबाबदार असल्याचा आरोप निवडणुकीदरम्यान पक्षातून हकालपट्टी झालेले विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांनी केला. देशमुख यांचा उपहासात्मक सत्कार कार्यक्रम ढवळे यांनी आयोजित केला होता. पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हा प्रमुख किशोर इंगळे आणि अन्य शिवसैनिकांनी हा कार्यक्रम उधळून लावला. यावेळी दोन गटात हाणामारी झाली.

<><><><>

रायगड जिल्ह्यातल्या खोपोली इथल्या मंगेश काळोखे यांच्या हत्येसंदर्भातला खटला जलदगती न्यायालयात चालविला जाईल, मारेकऱ्यांना सोडणार नाही, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्र्यांनी आज खोपोलीत जाऊन दिवंगत काळोखे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं, त्यावेळी ते बोलत होते. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत शिंदे सेनेच्यावतीनं मानसी काळोखे विजयी झाल्या. त्यानंतर दोनच दिवसात त्यांचे पती मंगेश काळोखे यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी सात जणांना पोलिसांनी अटक केल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

त्यात प्रमुख आरोपी सूत्रधार रवींद्र देवकर आणि त्याचा मुलगा दर्शन देवकर यांचा समावेश आहे.

दरम्यान, ही घटना अत्यंत निंदनीय असून या घटनेचा तीव्र शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी निषेध व्यक्त  केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तपास यंत्रणांमध्ये व्यापकता आणून SIT स्थापन करावी, अशी मागणी देखील तटकरे यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

<><><><><>

नागपूर जिल्ह्यातल्या नरखेड तालुक्यात आदिवासी समाजातल्या ३ मुलांना पोलीस ठाण्यात मारहाण झाल्याच्या घटनेची गंभीर दखल राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाने घेतली आहे. दिंदरगाव इथं आदिवासी समाजातल्या ३ अल्पवयीन मुलांना पोलीसांनी ताब्यात घेऊन, पोलीस ठाण्यात नेऊन मारहाण केल्याचं वृत्त स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालं होतं. त्याची दखल घेऊन आयोगानं घटनेची वस्तुस्थिती आणि संबंधित कर्मचाऱ्यांवर केलेली कारवाई तसंच पीडित मुलांच्या संरक्षण आणि पुनर्वसनासाठी केलेल्या उपाययोजनांचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात जांबूड गावात बळजबरीने कोंडून ठेवलेल्या ५३ आदिवासी मजुरांची राजस्थान पोलिसांनी सुटका केली आहे.  यात १३ महिला आणि ४० पुरुषांचा समावेश आहे. राजस्थानातल्या या मजुरांना इंदूरमध्ये चांगल्या नोकरीच आमिष दाखवून दोन दलालांनी सोलापुरात आणून शेतात कामाला लावलं होतं. शेतमालकाकडून मजुरांच्या पगारापोटी सुमारे अठ्ठावीस लाख रुपये एकरकमी घेऊन या दलालांनी पळ काढला होता. या शेतमजुरांनी पगाराची मागणी केल्यावर त्यांना मारहाण करून कोंडून ठेवण्यात आलं होतं. महिला मजुरांवर लैगिक अत्याचारही करण्यात आले होते. या प्रकाराची माहिती कळल्यावर राजस्थान पोलिसांनी कारवाई करत या मजुरांची सुटका केली असून सर्व आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या कार्यक्रमातून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत . हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग असून त्याचं

थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसेच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होणार आहे.

**<><><><>**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होणाऱ्या मुंबईतल्या हॉटेल्स, रेस्टोरंटस आणि बार इत्यादी आस्थापनांमध्ये आगीपासून बचावासाठी पुरेशा उपाययोजना आहेत किंवा नाहीत याची तपासणी करण्यासाठी मुंबई अग्निशमन दल विशेष अग्निसुरक्षा मोहीम राबवत आहे. त्याअंतर्गत २२ डिसेंबर पासून मुंबईतल्या ९०७ आस्थापनांची तपासणी पूर्ण झाली आहे. अग्निसुरक्षेबाबतच्या नियमांचं पालन न करणाऱ्या ४१ आस्थापनांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून १६ आस्थापनांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

**<><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><>//**